# पाळं

गरीब असो वा श्रीमंत प्रत्येकाच्या स्वयंपाक घरात माझे अस्तित्व। रंगरूप चटकदार उघडलाच सळरंगी डब्याचे दार।

स्वयंपाकघरात मला मान। पदार्थांची वाढले माझ्यामुळे ज्ञान। सांगा ओळखलत का मला? रंगीबेरंगी मी असतो सदा। त्यामुळे पदार्थांची येते मजा। चविष्ट होतो मग स्वयंपाक कसा। अहो, उपयुक्त मी गृहीणींसाठी सदा॥

पूर्वी अष्टकोनी, षट्कोनी, चौकोनी, गोल टगाऊडी असे माझे होते रुप। आलिकडे मात्र निरनिराळ्या धातूंचा तर केव्हा गरज पडल्यास पॉलिथीन, कागद, प्लॅस्टीक बरण्यांचा होतो उपयोग। कार्य मात्र पूर्वापारच।

गृहीणींच्या व घरातील मंडळींच्या आवडी व रुचीनुसार माझा विस्तार। कल्पकतेनुसार होतो नित्य नवा आविष्कार। जुने नाव माझे मिसळणीचा डबा। कुणी तरी म्हणतं पाळं। आलिकडे मसाल्याचा वा तिखटमीठाचा डबा म्हणतात हो मला॥

खण त्यात असतात सात। माझ्याशिवाय होतच नाही स्वयंपाकाचे काम ही आहे कि नाही मोठी बात?

सौ. उज्ज्वला श्रीराम प्रभुणे,
वृंदावन हाईट्स


प्रमाणात करते जी ह्या रंगांची उधळण
तीच असते अन्नपूर्णा व सुगरण
सप्त रंगाचा रोज खेळते ती खेळ
तेव्हा संसाराचा बसतो मेळ